अधिव्याख्याता, कलेचा इतिहास, शासकीय कला संस्था, कला संचालनालय, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा, गट-अ पदावरील सरळ सेवेने नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. अेडीआर-२७११/प्र.क्र.९४/१७/तांशि ६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८ मार्च, २०१८.

<u>पहा</u> :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. क्र २०४४(१९)/२२३८/सात-अ
दि. १८ जुलै, २०१७.

<u>शासन निर्णय</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत खालील उमेदवाराची अधिव्याख्याता, कलेचा इतिहास, शासकीय कला संचालनालय, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा, गट-अ या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकान्यात ते ज्या दिनांकापासून त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकृत करतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे.

गुणवत्ता क्र.	आयोग पुरस्कृत उमेदवाराचे नाव	वर्गवारी	आयोगाने शिफारस केलेली वर्गवारी	दि. १५ जून, २०१७ च्या अधिसुचनेनुसार वाटप केलेला महसूली विभाग	नियुक्तीचे ठिकाण	ज्या अटीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात आली त्या अटी
१	२	३	४	५	६	७
१	श्री. चव्हाण विनोद नानजी	अ.जा	अ.जा	नागपूर	अधिष्ठाता, शासकिय कला व अभिकल्प नागपूर	संगणक हाताळणी/ वापराबाबतचे प्रमाणपत्र, चारित्र्य पडताळणी अहवाल, जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीस अधिन राहून.

२. उपरोक्त उमेदवारास वैद्यकीय मंडळाने वैद्यकीयदृष्ट्या शासकीय सेवेत पात्र ठरविले आहे. अशी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

३. उपरोक्त उमेदवारांची चारित्र्य पडताळणी अहवाल अप्राप्त आहे. सदर उमेदवाराने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र चापअ-१००८/प्र क्र.२१४/०८/१६-अ, दि.०९ जानेवारी, २००९ नुसार

चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र नियुक्ती आदेशापासून सहा महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. जर सदर प्रमाणपत्रे त्यांनी विहित मुदतीत सादर केले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. सदर उमेदवारांची नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून त्यांच्या चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निर्दशनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देवून समाप्त करण्यात येईल.

४. उपरोक्त उमेदवारांची अधिव्याख्याता, कलेचा इतिहास विभाग, शासकीय कला संस्था, कला संचालनालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

अटी :-

१) सदर उमेदवाराची वेतनश्रेणी रू १५६००-३९१००, ग्रेड पे ५४०० अशी राहिल.

२) सदर वेतनश्रेणी व्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहिल.

३) सदर उमेदवारास प्रथम वेतनवाढ परिविक्षाधीन कालावधीतील एक वर्ष पुर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

४) परिविक्षाधीन कालावधीत कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास, तसेच त्यांचे काम असमाधानकारक व वर्तन अननुरुप आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

५) उमेदवार यापूर्वी हिंदी व मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास, त्या परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास उमेदवाराची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.६१/२००१/३९, दि. ७.८.२००० अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक पडताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.३.२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही, तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

७) सदर उमेदवाराचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१मधील तरतूदीनुसार निश्चित करण्यात यावे.

८) उमेदवाराने नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

९) नियुक्ती दिलेल्या पदावर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत रुजू व्हावे. प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी सदरहू मुदतीत शासनास काहीही कळविले नाही तर, कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे आदेश रद्द करण्यात येतील.

१०) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४ दि. १८.०८.२००९ मधील तरतूदीनुसार दि. १ नोव्हेंबर २००५ पुर्वी शासन सेवेत निवृतीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचा-याने त्याच किंवा अन्य विभागातील निवृतीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दि. १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक वित विभाग, क्रमांक अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२.१.२००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधीत शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि. १२.१.२००७ रोजीच्या परिपत्रकात नमूद (i) ते (iv) येथील सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय

कर्मचा-यास राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू ठरेल.

११) सदर उमेदवाराचे सेवानिवृतीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

१२) सदर उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

५. सदर नियुक्ती उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील. सदर प्रमाणपत्र नियुक्तीनंतर खोटे अथवा बनावट आढळल्यास सदर उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

६. हे आदेश प्राप्त होताच संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल प्र. कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावा. तसेच प्र. कला संचालक यांनी उमेदवाराचा रूजू अहवाल शासनास सादर करावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेताक २०१८०३०८१७०८२१८५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

Digitally signed by Kamini R Pilankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bd66db73425a9730e4074ae475eb26788ae32a45d13639a02fcf2ffbd43272ff, serialNumber=791d70f75a8bfaa8349786f02d71cad4fb9d1999ea0d92d63dcf5de198d4f817, cn=Kamini R Pilankar
Date: 2018.03.08 17:09:03 +05'30'

(का.रा.पिळणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. श्री.चव्हाण विनोद नानजी, c/o गोविंदराव खंगार, प्लॅाट क्र. ०७,न्यु स्नेह नगर कॉलनी, वर्धा रोड, नागपूर-४४००१५.

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्राद्वारे)
२. प्र.कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र -२, नागपूर
४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
५. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर. (वरील उमेदवारांला रूजू करून घेताना त्यांच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी करून संस्थाप्रमुखांनी स्वत: खात्री करावी व सदर उमेदवारांला हजर करून घ्यावे आणि त्याबाबतचा अहवाल कला

संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा. तसेच संबंधित अधिष्ठातांनी या आदेशातील उमेदवाराने नियुक्ती ज्या अटींच्या अधीन राहून केली आहे, त्या अटींची पुर्तता त्या उमेदवाराकडून विहित मुदतीत करून घेवून त्याबाबतचा कार्यपूर्तता अहवाल कला संचालक, महाराष्ट्र शासन मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.)

६. निवड नस्ती (तांशि-६).